# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

दुरध्वनी क्र.२३३३५३६-४०, २३४८००१-०५ फॅक्स क्र. (०२४०) २३३१२१३

जा.क्र.मनपा/आस्था-१/२०२०/४३०. दिनांक :- ०८/०५/२०२०.

**आदेशः-**

औरंगाबाद शहरात कोव्हीड-१९ या विषाणुचा प्रार्दुभाव मोठया प्रमाणावर होत आहे. तसेच दिनांक १७ मे, २०२० नंतर लॉकडाऊन उठविल्यानंतर मोठया प्रमाणात लागण होण्याची शक्यता आहे. ही शक्यता विचारात घेऊन, महानगरपालिकेमार्फत ३००० रुग्णांकरीता कोव्हीड केअर सेंटर(CCC) तयार करण्यात आले आहे. त्यापैकी सध्या ०७ केंद्र Active झालेले आहेत व उर्वरीत कोव्हीड केअर सेंटर आवश्यकतेनुसार Active होतील. तथापि कोव्हीड केअर सेंटर येथे प्रशासकीय मनुष्यबळ,तांत्रिक मनुष्यबळ,तज्ञ मनुष्यबळ तसेच या कोव्हीड केअर सेंटर येथे लागणारे मुळ इन्फ्रास्ट्रक्चर व वैद्यकीय सुविधा या बाबी प्रोटोकॉल नुसार होणे आवश्यक आहे. याबाबत सविस्तर अहवाल व सूचना होणे आवश्यक आहे. याकरीता खालीलप्रमाणे टास्क फोर्सची स्थापना करण्यात येत आहे.

| अ.क्र. | समिती सदस्यांचे नांव व पदनाम | |
|---|---|---|
| १) | डॉ.कानन येळीकर, अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद | अध्यक्ष |
| २) | डॉ.सुंदर कुलकर्णी, जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, चिकलठाणा, औरंगाबाद | सदस्य |
| ३) | डॉ.प्रविण सुर्यवंशी,एम.जी.एम.हॉस्पीटल | सदस्य |
| ४) | डॉ.हिमांशु गुप्ता,धुत हॉस्पीटल | सदस्य |
| ५) | डॉ.तुपकरी, हेडगेवार हॉस्पीटल | सदस्य |
| ६) | डॉ.आलोक श्रीवास्तव,कमलनयन बजाज हॉस्पीटल | सदस्य |
| ७) | डॉ.संतोष रंजलकर, अध्यक्ष,आय.एम.ए. | सदस्य |
| ८) | डॉ.संजय पटणे,अध्यक्ष,फिजीशिअन असोसिएशन | सदस्य |
| ९) | डॉ.अभिजित चपळगांवकर,अध्यक्ष,डेंटल असोसिएशन | सदस्य |
| १०) | डॉ.निता पाडळकर, आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद | सदस्य सचिव |

वरील टास्क फोर्सने अभ्यास करुन महानगरपालिकेचे कोव्हीड केअर सेंटरवर प्रोटोकॉलप्रमाणे आवश्यक मनुष्यबळ, फिजिशिअन, एम.बी.बी.एस., बी.ए.एम.एस./ बी.एच.एम.एस., नर्सेस, टेक्निशिअन्स, वॉर्ड बॉय इ. आवश्यक इन्फ्रास्ट्रक्चर(पीपीई किट, ऑक्सीजन सिलींडर, व्हेंटीलेटर, other related infrastructure) मेडीसिन्स रिक्वायरमेंट तसेच प्रत्येक मनुष्यबळाची कामाची जबाबदारी, रुग्ण दाखल झाल्यापासून ते गरज भासल्यास रुग्ण स्थलांतर करण्याची जबाबदारी यासह या कोव्हीड केअर सेंटरमध्ये नियुक्त प्रत्येक व्यक्तीची कामाची जबाबदारी, कामाच्या वेळा यासह सविस्तर अहवाल तयार करुन तीन दिवसांत सादर करावा. त्यानुसार महानगरपालिकेचे हे कोव्हीड केअर सेंटर लवकर कार्यान्वित करणेबाबतचे काम सुरु करता येईल.

(आस्तिक कुमार पाण्डेय)
भा.प्र.से.
प्रशासक
महानगरपालिका, औरंगाबाद.

प्रत :-
१) मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर.
२) जिल्हाधिकारी, औरंगाबाद.
३) सर्व समिती सदस्य
४) शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद
५) आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद
६) आदेश संचिका